महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १४ वे दिनांक : ०२/०१/२०२६ वार : गुरूवार

## सत्ताधाऱ्यांचा एकही अर्ज बाद नाही - अविनाश जाधवांचा आरोप



**मुंबई** : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी सुरू असतानाच, अनेक ठिकाणी विरोधकांचे अर्ज बाद झाल्याने महायुतीच्या उमेदवारांना बिनविरोध विजयाची संधी मिळाली आहे. कल्याण-डोंबिवलीमध्ये भाजपचे ५ आणि शिवसेना शिंदे गटाचे ४ उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, ठाण्यातही विरोधकांचे अर्ज बाद झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर, मनसे नेते अविनाश जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेत सत्ताधारी पक्ष निवडणूक अधिकाऱ्यांशी संगनमत करून जाणीवपूर्वक विरोधकांचे अर्ज बाद करत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

अविनाश जाधव म्हणाले, निवडणूक अधिकाऱ्यांकडून अनेक ठिकाणी पक्षपातीपणा करण्यात येत आहे. त्यात बरेच अर्ज बाद झाले आहेत. पडताळणी होण्याच्या अर्ध्या तास आधी उमेदवारांचे अर्ज डिस्पले केले जातात. त्यानंतर त्यावर आक्षेप घेतला जातो. परंतु ठाण्यात सकाळी ११ ऐवजी ३.३० वाजता हे अर्ज बाहेर लावले. त्यात शिंदेसेनेच्या उमेदवारांच्या अर्जात निरंक जागा होत्या. जिथे काहीच भरले नव्हते. नियमानुसार जर एखादी जागा रिक्त ठेवली असेल तर तो बाद होतो. यावर विरोधकांनी आक्षेप घेतला तेव्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, असा आरोप जाधव यांनी केला आहे.

पुढे बोलताना अविनाश जाधव म्हणाले, तसेच सत्ताधारी एकही अर्ज बाद केले नाहीत. विरोधकांचे आणि अपक्षांचे अनेक अर्ज बाद करण्यात आले. हे सगळे पाहता ही संपूर्ण निवडणूक यंत्रणा वाईटरित्या चालवली जात आहे. ठाणे महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी हे निवडणूक अधिकारी असतात. या लोकांचे सत्ताधारी नेत्यांसोबत साटेलोटे असते. सत्ताधारी नेते आणि प्रशासकीय नेते मिळून ही निवडणूक प्रक्रिया मलिन करतात. त्यामुळे अनेक लोकांचे अर्ज बाद झाले. गेले १० वर्ष हे लोक मेहनत घेत होते. त्यांचे करिअर या भ्रष्ट यंत्रणेकडून बर्बाद करण्यात आले. जर अशाच प्रकारे निवडणुका होत असतील तर आम्ही निवडणूक लढायच्या कशाला? असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला.

लढायची ताकद नाही. अपक्षांना खरेदी करायचे आणि त्यातून कुणी उमेदवार उरले तर निवडणुकीत पैसा ओतायचा. सत्तेचा वापर, दबाव आणि पैसे वापरून तरुणांचे करिअर बर्बाद करायचे हे काम सत्ताधारी करतात. हेच जर करायचे असेल तर राजेशाही घोषित करा. लोकशाहीच्या बाता कशाला करायच्या. निवडणूक आयोग केवळ नावापुरते स्वायत्त संस्था आहे. परंतु त्यात काम करणारे अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतले आहेत, असा आरोपही अविनाश जाधव यांनी केला आहे.




## महावितरणचे 'मिशन नाइन्टी डेज'

**छत्रपती संभाजीनगर** : थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याची 'मिशन नाइन्टी डेज' ही मोहीम महावितरणने नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसांपासून सुरू केली आहे. आर्थिक वर्ष संपेपर्यंत आगामी ९० दिवस चालणाऱ्या या मोहिमेत वीजबिल वसुलीबरोबरच वीजचोरांवरही धडक कारवाई केली जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलात सध्या वीजबिल थकबाकीचे संकट गडद झाले आहे. घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील जवळपास साडेचार लाख ग्राहकांकडे सुमारे ३०० कोटी रुपयांची वीजबिल थकबाकी आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, अनेक ग्राहकांनी काही दिवसांपासून एक रुपयाचाही भरणा केलेला नाही. यामुळे वीजबिल थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदारांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. पाच हजार थकबकीदारांचा वीजपुरवठा डिसेंबर महिन्यात खंडित करण्यात आला. आता कारवाईची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

या मोहिमेत अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांसह परिमंडलातील विविध कार्यालयांत कार्यरत अधिकारी व कर्मचारीही तैनात करण्यात आले आहेत. गुरुवारी (१ जानेवारी) शहरातील शहागंज उपविभागात शहागंजसह क्रांती चौक व पॉवर उपविभाग, छावणी उपविभागात छावणी, वाळूज व गारखेडा उपविभाग आणि चिकलठाणा उपविभागात चिकलठाण्यासह सिडको उपविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोहीम राबवली. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे यांनीही मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. चिकलठाणा व शहागंज उपविभागातील काही थकबाकीदारांचा वीजपुरवठा त्यांच्या उपस्थितीत कायमस्वरूपी खंडित करण्यात आला.

थकबाकी वसुली करताना काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता, ही कारवाई पोलिस बंदोबस्तात केली जाणार आहे. कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता ही मोहीम अधिक गतिमान केली जाणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. तसेच महावितरण कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण करणाऱ्यांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याच्या सूचना मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी परिमंडलातील सर्व अभियंत्यांना दिल्या आहेत.

थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केल्यानंतर काहीजण शेजाऱ्यांकडून बेकायदेशीररीत्या वीजपुरवठा घेतात. असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर वीजचोरीचा गुन्हा दाखल करून अनधिकृत वीज देणाऱ्या शेजाऱ्याचा वीजपुरवठा खंडित केला जाईल. एखाद्या ठिकाणचा वीजपुरवठा खंडित केल्यानंतर संबंधित ग्राहकाचे शहरात दुसरे कनेक्शन असल्यास त्यावर थकबाकी वळवली जाणार आहे.

ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी रांगेत उभे रहावे लागू नये व वेळ वाचावा यासाठी महावितरणने ऑनलाइन सुविधा दिली आहे. यूपीआय, नेट बँकिंग, वॉलेट्स, मोबाईलमधील फोन पे, गुगल पे आदी ॲप्स आणि महावितरणच्या वेबसाइटद्वारे घरबसल्या वीजबिल भरता येते. वीजबिलावरील क्यूआर कोड स्कॅन करूनही थेट बिल भरता येते. वीजबिल मुदतीत व ऑनलाइन भरल्यास बिलावर सुमारे १.२५ टक्के सूट मिळते.

वीजबिलासंबंधित तक्रार असणाऱ्या ग्राहकांसाठी ५ जानेवारी रोजी सर्व उपविभाग कार्यालयांत वीजबिल दुरुस्ती मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. त्रुटी असलेल्या बिलांची दुरुस्ती केली जाईल. ग्राहकांनी मेळाव्याचा लाभ घेऊन वीजबिल दुरुस्ती व बिलांसंबंधीच्या इतर तक्रारींचे निराकरण करून घ्यावे. दुरुस्त केलेले वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महावितरणतर्फे सर्व वर्गवारीतील ग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे नियमाने गरजेचे आहे. अन्यथा महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. कुणी वीजबिल वसुलीत अडथळा आणल्यास त्याच्यावर पोलिस कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे सर्वांनी थकित वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६


## महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष "श्रमसंस्कार शिबिराचे" रहाळपट्टी तांडा येथे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष "श्रमसंस्कार शिबिर"आयोजित करण्यात आले होते. यात सकाळी रहाळपट्टी तांडा येथे स्वच्छता करून व्यसनमुक्ती या विषयावर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर या विशेष शिबिराचे सकाळी १०.०० वाजता रहाळपट्टी तांडा सरपंच सौ. छायाताई चव्हाण यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार व डॉ. अन्विता अग्रवाल, श्री. नंदूभाऊ चव्हाण, श्री. नितीन चव्हाण, डॉ. प्रतिभा धोंडकर, डॉ. शिवाजी वाघमारे, डॉ. अजय पवार, प्रा. दत्तू लहाने व ग्रामस्थांची उपस्थिती या शिबिराला होती. राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या पहिल्या दिवशी गावकऱ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने औरंगाबाद, चिकलठाणा लायन्स नेत्र रुग्णालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.सदर नेत्र तपासणी शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटातील लोकांनी तपासणी करून घेतली. डोळ्यांची दृष्टी तपासणी, चष्म्याची गरज, मोतिबिंदू तसेच इतर नेत्रविकारांची प्राथमिक तपासणी तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या शिबिरास गावकऱ्यांकडून अतिशय उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळाला. गरजू रुग्णांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले तसेच आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.मोफत नेत्र तपासणी शिबिरात एकूण ११३ जणांनी नेत्र तपासले त्यापैकी १४ जणांना मोतीबिंदू असून त्यांच्या पुढील ऑपरेशनची जबाबदारी लॉयन्स नेत्र रुग्णलय यांनी घेतली व नेत्रातील इतर दोषांसाठी त्यांना मार्गदर्शन करून चष्म्याचे नंबर देण्यात आले. वयोवृद्ध नागरिकांची मधुमेह तपासणी व रक्तदाब तपासणीही करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नोंदणी, रुग्णांची रांग व्यवस्थापन, मार्गदर्शन तसेच शिबिराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती झाली आणि NSS शिबिराचा उद्देश प्रभावीपणे साध्य झाला. नेत्र तपासणी दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेविकांनी माझ्या स्वप्नातील भारत या विषयावर निबंध लेखन केले तर काही विद्यार्थिनींनी चित्र रेखाटले. त्यानंतर द्वितीय सत्रात मोबाईल एक व्यसन या विषयावर रा.से.यो विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले.

## मुंबईतील पतसंचलन परेडसाठी कु. दिपाली गायकवाड यांची निवड



**कन्नड :** दि. २६ जानेवारी २०२६ रोजी भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य पथसंचलन (परेड) कार्यक्रमासाठी शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील एनएसएस विभागाची स्वयंसेविका कु दिपाली गायकवाड हिची निवड करण्यात आली आहे. कु दिपाली गायकवाड ही शिवाजी महाविद्यालयाची पहिली विद्यार्थिनी आहे जिची पथसंचलन परेड साठी निवड झाली आहे ही निवड त्यांच्या शिस्तबद्ध कार्यशैली, सातत्यपूर्ण परिश्रम आणि उत्कृष्ट प्रशिक्षणाच्या आधारे करण्यात आली आहे.तिने यापूर्वी विविध शासकीय व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला असून, आपल्या कर्तृत्वाने संस्थेचे, महाविद्यालयाचे व कन्नड परिसराचे नाव उज्वल केले आहे. मुंबईसारख्या महानगरात होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील पथसंचलन परेडमध्ये सहभागाची संधी मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे.तिच्या या निवडीमुळे संस्थेचे अध्यक्ष मा. मानसिंहजी पवारसाहेब तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही एन भोसले उपप्राचार्य डॉ. बी के मगर यांनी अभिनंदन केले असून एन एस एस विभागातील कार्यक्रमाधिकारी,डॉ पी बी महाजन, डॉ राकेश अहिरराव, डॉ.सीमा काशीद, इतर स्वयंसेवक तसेच मित्रपरिवारामध्ये आनंदाचे व उत्सवाचे वातावरण असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी परेडमध्ये कु दिपाली गायकवाड आपल्या कर्तृत्वाचा ठसा नक्कीच उमटवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## इकरा पब्लिक हायस्कूलच्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे थाटात उद्घाटन



जळगाव : इकरा पब्लिक हाईस्कूल येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचा गट शिक्षण अधिकारी अजित तडवी साहेब यांच्या शुभ हस्ते क्रीडा ध्वज फडकविण्यात आला तर मजीद झकेरिया साहेब यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली शालेय समिती चेअरमन डॉ.करीम सालार व एजाज मलिक यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.स्कूलच्या क्रीडा विभागातर्फे वार्षिक क्रीडा उत्सव २०२५ चे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या खेळाडूंनी चपळाई, चिकाटी आणि आनंदी हास्याने सारा परिसर दुमदुमून निघाला.यां यावेळी इकबाल मिर्झा,इरफान भाई सालार,वसीम शाह,वसीम चौधरी,कारी कुद्दुस साहेब, प्रो.इरफान शेख, डॉ.शोएब शेखआदी उपस्थित होते.आपल्या भाषणात अजित तडवी साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी खेळ, भावना जपून खेळावे व खेळातून शिस्तीचे दर्शन घडवून आणावे असे आवाहन केले.डॉ.करीम सालार व एजाज मलिक यांनी मनोगतातून शिक्षणासह शारीरिक तंदुरुस्तीचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.विद्यार्थ्यांनी प्रभावी संचालन सादर करून उपस्थितांची मने जिंकली.एकतेतच शक्ती आणि शिस्तीतच सौंदर्य याची जणू जिवंत झलक त्यांनी सादर केली. या वेळी सांघिक खेळ आणि मैदानी खेळ यातील अनेक स्पर्धा भरवण्यात आल्या .स्पर्धेच्या विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर अभिमानाची झळाळी दिसत होती.


**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६


## कवी ज्ञानेश्वर गायके यांना कै. सावित्रीबाई जोशी पुरस्कार जाहीर



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील प्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर कचरु गायके यांच्या 'पेरणी' या कविता संग्रहास जीवन विकास ग्रंथालय संभाजीनगर संस्थेतर्फे दिला जाणारा कै. सावित्रीबाई जोशी साहित्यिककृती पुरस्कार जाहीर झाला आहे.जीवन विकास ग्रंथालया तर्फे हा पुरस्कार दरवर्षी मराठवाड्यातील लेखकांची पहिली साहित्य कलाकृती पुरस्कार गेल्या सत्तावीस वर्षांपासून देण्यात येतो. दि. ०७ जानेवारी रोजी सायंकाळी साडे सहा वाजता कवीवर्य दासू वैद्य यांच्या हस्ते, न्या. अंबादासराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्काराचे वितरण ग्रंथालयाच्या ग्रंथमित्र भा.बा. आर्वीकर सभागृहात करण्यात येणार असल्याची माहिती ग्रंथालय कार्यवाहक रा.शं. बालेकर यांनी दिली.याबद्दल त्यांचे तिफण साहित्य परिवार कन्नड तालुका मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजयजी भोसले, डॉ. रमेश सुर्यवंशी, जेष्ठ विधिज्ञ कृष्णा पाटील जाधव, अंबादास सगट, रंगनाथ लहाने, संस्थापक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, ब्रम्हगिरी गोस्वामी, भिमराव सोनावणे, दत्ता मोरसकर, का.का. थोरात, प्रवीण दाभाडे, अरुण थोरात, लक्ष्मण वाल्डे, सुरेश औटे, संदिप वाकडे, शिवनाथ गायकवाड, अनिता राठोड, शुभदा देवरे, गीतांजली गजबे आदींनी अभिनंदन केले आहे.

## जितो पब्लिक स्कूलची ईश्वरी सोनवणे हिची भरारी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** भोपाल, मध्यप्रदेश येथे आयोजित ६८व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत कुमारी ईश्वरी निलेश सोनवणे!हिने प्रभावी गुण मिळवले आणि तिची भारतीय राष्ट्रीय संघ निवड चाचणी साठी निवड झाली आहे. कठोर परिश्रमांमुळे, सातत्यामुळे आणि आत्मविश्वासामुळे हे यश मिळाले आहेरायफल शूटिंग संघात निवड झाल्याबद्दल गरूड झेप च्या वतीने सन्मान करण्यात आला आहेतिच्या या यशाबद्दल तिचे गरुड झेप चे संस्थापक अध्यक्ष सुरेश सोनवणे, संचालक निलेश सोनवणे,प्राचार्य सावित्री डकरे व मीरा देशपांडे ,क्रीडा प्रशिक्षक रोहित राठी सर्व शिक्षक,विद्यार्थी, सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे

## सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांचे नाते आपुलकी आणि स्नेहाचे राहणार - बसवराज पाटील




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कै. माधवराव (काका) पाटील ज्या उद्देशाने शैक्षणिक संस्थेची उभारणी केली. त्यांचे स्वप्न होते की, संस्थेत चांगली माणसे आली पाहिजेत. त्यामुळे नगर शिक्षण विकास मंडळ या संस्थेत जे कर्मचारी नियुक्त केले गेले ते गुणवत्ताधारक होते आणि आहेत. चांगली माणसे निर्माण होणे ही संस्थेची परंपरा असून ज्या कर्मचाऱ्यांनी संस्थेत राहून मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यामुळेच संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रात नाव होत आहे. संस्था म्हणजे एक परिवार असून प्रत्येक कर्मचारी हा संस्था व पाटील परिवाराशी एकरुप असून आमचे नाते अतूट बनले आहे. सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांचे नाते आपुलकी आणि स्नेहाचे राहणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भाजप लातूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष बसवराज पाटील यांनी प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. अशोक सपाटे व प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे यांचा गुरुवारी (ता. १) रोजी नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम च्या वतीने माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात संस्थेच्या वतीने सेवापुर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते सपाटे व बनसोडे यांचा संपूर्ण आहेर उपचार करून सपत्नीक सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बसवराज पाटील होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीप भालेराव, संस्थेचे संचालक राजू भोसगे, प्राचार्य डॉ. सादक वली, प्राचार्य उल्हास घुरघुरे, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर, दत्तप्रसाद शेळके, कांत हुलसुरे, काशिनाथ मिरगाळे, बाबुराव जाधव, देवेंद्र कंटेकुरे, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, सौ. उषा सपाटे, प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे, सौ. वैशाली बनसोडे, मुख्याध्यापक इरफान मुजावर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी बसवराज पाटील म्हणाले की, या संस्थेत प्राध्यापक ते प्राचार्य म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र कार्य केल्यानेच आज त्यांचे विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये नावारुपाला येत आहेत. सत्काराला उत्तर देताना सपाटे म्हणाले की, जे अनुभव मला या संस्थेत काम करताना आले त्यांचा लेखाजोखा मांडून सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून सर्व उपस्थितांचे आभार मानले. डॉ. बनसोडे म्हणाले की, संस्थेच्या प्रती आम्ही कायम ऋणात राहून पुढच्या काळात देखील संस्थेशी एकरूप राहू. यावेळी प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. विविध शाळेतील मुख्याध्यापक, सहशिक्षक, सहकारी मित्र, नातेवाईक, मुरूम शहरातील पदाधिकारी-कार्यकर्ते आदींनी त्यांचा यथोचित सत्कार केला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६


# सिल्लोड जवळ आढळली पर्यावरणीय दुर्मिळ 'मुरमाटी' बाभूळ





**कन्नड (अरुण थोरात) :** बाभूळ या वनस्पती च्या भारतात ३४ प्रकार, प्रजाती अस्तित्वात आहे, त्या पैकी 'मुरमाटी बाभूळ' ही प्रजाती आधीच दुर्मिळ व त्यात आता ती जवळपास नामशेष झाली आहे. सदरचा दुर्मिळ वृक्ष सिल्लोड जवळ खोडकाई रस्त्यावर लक्ष्मीकांत इंगे यांच्या गट नं- १७२ मध्ये शेताच्या बांधावर गत ७५ वर्षांपासून अस्तित्वात आहे. सिल्लोड येथील वनस्पती अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांना रस्त्याने जातांना फुलांच्या व पानाच्या आकारावरून तीचे वेगळेपण जाणवले व जवळ गेल्यावर ती मुरमाटी बाभूळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शेत मालक लक्ष्मीकांत इंगे यांना याबाबत कळवून तिचे संवर्धन करण्याचे महत्व ही पटवून दिले. सदर प्रजातीची शासनाने प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेस नोंद व्हावी म्हणून जी लोकजैवविविधता नोंद वही दिली जात आहे. तीत नोंद व्हावी म्हणून नगर परिषदेस विस्तृत शास्त्रीय माहिती असलेले पत्र ही देण्यात आले आहे. असे ही पाटील यांनी सांगितले. हीचे पर्यावरणीय मूल्य मोठे असून फुलपाखरांना बहुउपयोगी आहे. या झाडाच्या पिवळ्या फुलांकडे अन्ना साठी मधमाशा, कीटक, फुलपाखरे आकर्षित होतात. पॉईंटेड सिलेट ब्ल्यू, ब्राईट बबूल ब्ल्यू, डल बबूल ब्ल्यू, अनो मेलस नवाब ई. ०६ प्रजातीची फुलपाखरे यावरच अंडी घालून जीवन चक्र पूर्ण करतात. "सोन पाखरू - ज्वेल बग " हा सुंदर किडा यावर अधिवास करतो. या प्रजातीचे शास्त्रीय नाव "वॅचे लिया / अकेसीया इर्बनिया" (acacia ebernia) असे असून सर्वच झाडांना मुरमुट्या येत नाही. दमट हवामान, नदी - ओढे या काठच्या, नेहमी पाणी भरत्या शेतात दमट पणा लाभणाऱ्या या जातीस हा संसर्ग होतो. यात झाडाचे काही नुकसान सहसा होत नाही. ही बुरशी हवेने पसरते. खार, माकडे ती आवडीने खातात.मुरमाटी मानव उपयोगी असून फक्त याच बाभळीच्या प्रजातीवर रावेनालिया इस्कुलेंटा या रस्ट प्रकारची बुरशीचा प्रादुर्भाव या झाडास होतो. त्यामुळे झाडाच्या उती, पेशी यांची काटे, पाने, फुले, यालगत अनियंत्रित वाढ होते. ज्यास मूरमाट्या असे म्हटले जाते. याची भाजी केल्या जाते. यात पॉली फेनाल आक्सिडेज, इंडेल -३ असेटीक ऍसिड व इतर अमिनो ऍसिड ही उच्च दर्जाची प्रोटीन असते. ते शक्तीवर्धक ही आहे. यावर रिसर्च पेपर लिहिण्यास सुरुवात केली आहे. आता त्यास शेंगा लगडतील व त्या पासुन रोपं निर्मिती करून या प्रजातीचे रोपण केले जाईल. असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

# सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी अकत्तर पटेल यांना भव्य निरोप



**दौलताबाद : (जावेद अहमद):** माळीवाडा ग्रामपंचायत अधिकारी अकत्तर पटेल हे वयोमानानुसार आपले ३५ वर्ष सेवा करून दि ३१ डिसेंबर रोजी शासकीय सेवेतुन सेवा निवृत्त झाले आहे त्याच दिवशी ग्रामपंचायत च्या वतीने भव्य सेवा निवृत्त सोहळा आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच ज्योती नंदकिशोर मुळे हे होत्या तर प्रमुख उपस्थितीत दौलताबाद उपसरपंच सय्यद मतीन, ग्रामपंचायत अधिकारी प्रकाश तुपे, रंधे साहेब, सहायक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ हे होतेसर्वांनी आपआपले मनोगत व्यक्त करताना पटेल यांच्या कार्याचे उजाळा करून दिले पटेल यांनी आपल्या ३५ वर्ष कार्यकाळात चांगले वाईट अनुभव याचे कथन केलेयोगायोगाने त्यांचे ३१ डिसेंबर ला वाढदिवस असल्याने ते पण साजरे करण्यात आले यावेळी उपसरपंच मनेष गाजरे,ग्रामपंचायत सदस्य धमपाल गायकवाड, कमलाबाई अस्वार, प्रवीण बर्डे तसेच भीमराज बर्डे , नंदकिशोर मुळे, रहीम शेख, दीपक घुसले,प्रमोद साठे, गोपीचंद कुमरे,गणेश अस्वार,भगवान बनसोडे, नंदा खजिनदार, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी सागर जाधव, यादव शिंगारेअमोल साठे, कैलास भगत,सुभाष शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते

# जंगलात लागलेला आगीचा वणवा विझविण्याचे प्रात्यक्षिक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जंगलाला लागलेली आग कशी वीजवावी याची ट्रेनिंग प्रात्यक्षिक दौलताबाद खुलताबाद रस्त्यावर दौलताबाद घाटावर कालिका माता मंदिर जवळ अग्नी प्रतिबंधित रेषा (डोंगराला लागलेली आग विझवण्याचा प्रयोग)मंगळवारी संध्याकाळी पाच वाजता यशस्वी करण्यात आला. डिसेंबर महिना संपत आला असून जानेवारी महिना लागणार आहे आता जंगलातील व डोंगरातील गवत वाळत आहे.रस्त्याच्या कडेला असलेले डोंगर खाली प्रवास करणारे प्रवासी हे निष्काळजी पणे बिडी, सिगारेट पिऊन निष्काळजीपणामुळे न विझवता फेकून देतात यामुळे वाळलेल्या गवताला आग लागून लाख मोलाची वन संपत्ती, सरपटणारे प्राणी तसेच पाखरांची घरटी, जळून खाक होते. अग्नी प्रतिबंधित रेषा म्हणजे लागलेली आग कशी वीझवावी याची ट्रेनिंग दौलताबाद खुलताबाद रस्त्यावर दौलताबाद घाटावर कालिकामाता मंदिरजवळ मंगळवारी संध्याकाळी पाच वाजता यशस्वी करण्यात आली. उप. वन संरक्षक सुवर्ण माने, सहाय्यक व संरक्षक आशा चव्हाण, वन परिक्षेत्र अधिकारी निखिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल दौलताबाद. सुधीर धवन, वनरक्षक सुनील कळपे, वनसेवक प्रभुदास हजारे, रघु सोनवणे, व इतर पाच सहा कर्मचाऱ्यांनी यशस्वी सहभागी होऊन पार पाडले. अग्नी प्रतिबंधित रेषा या साठी करण्यात आली की डोंगराला आता कधीही आग लागू शकते यामुळे वनसंपदा राष्ट्रसंपती व प्राणी,पक्षी यांचे नाहक प्राण जाते वनपाल दौलताबाद सुधीर धवन यांनी सांगितले


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६


# 'जीवदान' कादंबरी आणि 'राजहंस' प्रकाशन अनुभव

माझी अप्रकाशित 'जीवदान' कादंबरीची पीडिएफ फाईल नोव्हेंबर 2023 ला ईमेलने राजहंस प्रकाशनाकडे छापण्यासाठी विचारार्थ पाठवली होती. अचानक 23-02-2024 ला राजहंस प्रकाशनाकडून फोन आला की, 'आपली कादंबरी आम्ही प्रकाशनासाठी स्वीकारली आहे. अभिप्रायासाठी डॉ. विनया खडपेकर यांच्याकडे आपली कादंबरी पाठवली होती, कादंबरी छापण्यासाठी स्वीकारावी असे त्यांनी कळवले आहे. कादंबरीची ओपन वर्ड फाईल ईमेल करा. करारपत्र तयार करण्यासाठी आपली काही माहिती हवी आहे. तसा ईमेल पाठवला आहे. तो फॉर्म भरून आणि इतर माहितीही पाठवा. ती माहिती मिळाली की करारपत्र तयार होईल आणि पुस्तक लगेच प्रकाशित होईल.' ऐकून साहजिकच आनंद झाला. 'राजहंस प्रकाशना'तर्फे अजून माझे एकही पुस्तक प्रकाशित झाले नव्हते. ईमेल पाहिला. करारासाठी हव्या असलेल्या माहितीचा विहित नमुन्यातील फॉर्म भरून त्याच दिवशी तात्काळ ईमेलने पाठवला. (लेखकाचा तपशिल, बँक तपशिल, कॅन्सल चेक, फोटो इत्यादी). तसेच 'जीवदान' कादंबरी (संपूर्ण word open unicode file) व पीडिएफ ईमेलने त्याच दिवशी पाठवली. दोन तीन महिन्यांनी शिरीष शेवाळकर यांचा फोन आला. म्हणाले, 'करारपत्र पाठवले आहे, वाचून सही करुन पाठवा.' पाठवले. नंतर 19 जुलै 2024 ला राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांचा फोन आला, 'आधीचे काम साचल्यामुळे कादंबरी ऑक्टोबर 2025 ला प्रकाशित होईल, चालेल ना आपल्याला?' कादंबरी स्वीकृत झाल्यापासून 20 महिन्यात प्रकाशित होणार होती तरीही 'चालेल, काही घाई नाही' म्हणालो. ऑक्टोबर 2025 महिना उजाडला तरी पुस्तकाविषयी काही कळेना. म्हणून मी नोव्हेंबरला डॉ. सदानंद बोरसेंना फोन केला. ते म्हणाले, एक महिना उशीर होतोय पुस्तकाला, पण येईल एवढ्या दहा पंधरा दिवसात.' दहा पंधरा दिवसाचा उल्लेख ऐकून मी चकीत होत म्हणालो, 'मला फायनल तपासणीला पाठवताहेत ना पुस्तक? कारण कादंबरीतला बराच भाग अहिराणी भाषेत आहे, तो नीट तपासला पाहिजे. मुखपृष्ठही पाठवा पहायला.' ते म्हणाले, 'तशी काहीच आवश्यकता नाही. चांगली तपासणी झाली आहे. आणि मुखपृष्ठ हे आमच्याकडून लेखकाला सरप्राइज असते, म्हणून आपण लेखकाला आधी पाठवत नाही.' हे ऐकूनही चकीत झालो. नंतर काही दिवसांनी अचानक लेखकाच्या पुस्तक प्रतींचे पार्सल आले. न पाहिलेल्या मुखपृष्ठाबद्दल उत्सुकता होती. मुखपृष्ठात ढोबळ कल्पना असली तरी ठीक आहे, आवडले. लेखकाच्या पुस्तक प्रती, संपादकांचे पत्र, मानधनाचा धनादेश आणि सोबत पेढ्यांचा पुडासुध्दा होता. याआधी काही प्रकाशकांकडून पुस्तकांसोबत मानधनाचा धनादेश मिळाला होता, पण पुस्तकांसोबत मिठाई पहिल्यांदा मिळाली होती. पुस्तकांसोबतचे संपादकांचे पत्र लगेच वाचले, 'प्रिय डॉ. सुधीर राजाराम देवरे,सस्नेह नमस्कार.'जीवदान' ही तुमची अत्यंत अनवट कादंबरी तुमच्या हाती सोपवत आहे.पौगंडावस्थेतील एका मुलाच्या आयुष्यात घडलेल्या भीषण घटना, घडत्या वयात सामोरे आलेले विलक्षण प्रसंग, आईवडिलांचे संरक्षक छत्रच उद्ध्वस्त करणारी त्याच्या वाट्याला आलेली परिस्थिती या साऱ्यांनी त्याच्या आयुष्याचा चोळामोळा करून टाकलेला.भावनिक आंदोलने आणि मनोव्यापार यांची धक्कादायक कहाणी साकारणारी ही शोकांत कादंबरी वाचकाला चटका लावणारी ठरेल, अशी मला आशा आहे.या कादंबरीमध्ये हृदयावर चरे पाडणारी प्रत्यक्ष आणि प्रच्छन्न हिंसा वाचकाच्या नजरेसमोर उभी करणारे मुखपृष्ठ 'राजहंसी' कलाकार तृप्ती देशपांडे यांनी साकारले आहे. ते तुम्हालाही भावेल, याची मला खात्री आहे. या कादंबरीचे वेगळेपण अधोरेखित करणारी श्री. शशिकांत सावंत यांची प्रस्तावना कादंबरीला मूल्यवृध्दी देणारा वेगळा आयाम ठरते.आपल्या दोघांच्या समान उदिष्टामुळे - कादंबरी योग्य प्रकारे प्रकाशित व्हावी - या अडचणींवर मात करता आली.फोनवर आपल्याशी बोलणे झाले असता प्रकृतीच्या काही मर्यादांमुळे तुम्हाला सटाणा सोडणे शक्य होत नसल्याचा उल्लेख तुम्ही केला होता. नाशिकला येणे झाल्यास तुमच्याशी संपर्क साधेन. शक्य असल्यास सटाण्याला तुमची भेट घेण्याचा प्रयत्न करीन.तुमच्या कुटुंबीयांना आणि सुहृदांना सस्नेह नमस्कार.' - डॉ. सदानंद बोरसे, संपादक, राजहंस प्रकाशन, पुणे. पुस्तक प्रकाशित होताना प्रकाशनाने लेखकाला कसा सुखद धक्का दिला याबद्दलचे वरील सर्व कथन आहे. पण कादंबरीत नक्की काय आहे, तिचे कलात्मक मूल्य काय, मराठी सारस्वतात तिचे स्थान काय, याबद्दल शशिकांत सावंत प्रस्तावनेत म्हणतात, ''जीवदान' ही कादंबरी गोष्ट सांगण्याच्या प्रोसेसची गोष्ट आहे. तिचं कथासूत्र टोकदार ग्रामीण जाणिवांचं आहे. कादंबरीतला बराच भाग अहिराणी भाषेत असल्यामुळं भाषेबरोबर येणारे वाक्प्रचार, म्हणी आणि वेगळ्या शब्दांमुळं ती समृद्ध झालेली आहे. तिच्यामध्ये क्रौर्य आहे, काळा विनोद आहे, चरचरीत व्यक्तिरेखा आहेत आणि खान्देशच्या परिसरातल्या माणसांच्या स्वभावाच्या गोष्टी आहेत... नायकाच्या स्वतःच्या आणि वडिलांच्या आयुष्यातल्या कितीतरी लहान-सहान मार्मिक गोष्टींमुळं मुख्य कथानकाला प्रवाहीपणा येऊन कादंबरी कलात्मक होत जाते... या कादंबरीतील अहिराणी भाषेतील अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार, वाक्यप्रयोग हे आपल्याला वेगळं काही देऊन जातात... या कादंबरीचे सिक्वेल होतील असे अनेक बीजं तिच्या उपकथानकांत दडले आहेत... कुठल्याही कादंबरीला जीवनदृष्टी हवी, तिने मानवी व्यवहाराचं काहीतरी ज्ञान आपल्याला द्यायला हवं, कुणाच्या तरी जगण्यात आपण डोकावतो आहोत, हे भान द्यायला हवं. हे सगळं या कादंबरीत आहे... प्रसिद्ध कादंबरीकार आणि संपादक विल्यम मॅक्सवेल म्हणाला होता की, कथा एकावेळी एकच गोष्ट सांगत असते, कादंबरी एकावेळी अनेक गोष्टी सांगू पाहते. सुधीर देवरे यांच्या कादंबरीत अशा अनेक गोष्टी आहेत. चित्रमयता हा तिचा एक गुण आहे... यात वडील आणि मुलाचं जे नातं आलेलं आहे, ते मराठी साहित्यात कुठंच आलेलं नाही. अनेकदा ग्रामीण म्हणून म्हटल्या जाणाऱ्या कादंबरीत मानसिक आंदोलन किंवा मनोव्यापार यांचा अभाव आढळतो. इथं मात्र तसं होत नाही. मोजक्या शब्दांत व्यक्तिरेखा, प्रसंग आणि प्रदेश उभा करण्याची ताकद या लेखनात असल्यामुळं कादंबरी वाचता वाचता, कधी संपली हेच कळत नाही. कादंबरीच्या या नव्या प्रयोगानं मराठी साहित्यात मौलिक भर घातली आहे एवढं मात्र निश्चित!'' 'राजहंस प्रकाशना'साठी कादंबरी स्वीकृत करताना संपादिका डॉ. विनया खडपेकर म्हणतात, ''सुधीर देवरे यांची 'जीवदान' ही लघुकादंबरी वाचली. ग्रामीण भागातील अल्पशिक्षित समाजातील मुलगा. वडिलांचा खून करणारा हा अल्पवयीन मुलगा रिमांड होममधून आत्मकथन करतो आहे, अशी कल्पना. वडिलांनी आईला छळले, तिचा खून केला, म्हणून या मुलाने सूड उगवला. मुलाच्या वयाला झेपेलशा शैलीतले हे कथन आहे. त्यात लेखकाचा कोणत्याही प्रकारचा आवेश नाही. न्यायअन्यायावर पोपटपंची नाही. ग्रामीण भागातील कुटुंब-चित्र, गाव-चित्र कादंबरीत प्रभावीपणे उमटले आहे. जाताजाता वास्तव चित्र आणि काल्पनिक कथा यातील भेदही लेखक दाखवून जातो.'' पुस्तकात खूप मोठ्या प्रमाणात अहिराणी भाषा उपयोजित झाली असल्याने काही चुका राहून गेल्यात की काय म्हणून मी तात्काळ प्रकाशित झालेली कादंबरी पूर्ण वाचली. कादंबरीभर दोन चार किरकोळ चुका वगळता पुस्तक तपासणी चांगली झाली आहे. राजहंस प्रकाशनाने स्वीकारल्यापासून पुस्तक फक्त 21 महिन्यात प्रकाशित केले, हासुध्दा माझ्यासाठी एकूण छान आणि सुखद अनुभव होता. पुस्तक स्वीकृतीसाठी राजहंस प्रकाशनाने संपादक नेमले असले तरी कादंबरीच्या नावासह माझ्या संहितेत एका शब्दानेही त्यांनी बदल सुचवला नाही आणि परस्पर तसे काही संपादन केले नाही हेही खूप महत्वाचे वाटले.

शशिकांत सावंत यांनी कादंबरीला अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. श्री. दिलीप माजगावकर, डॉ. विनया खडपेकर, डॉ. सदानंद बोरसे, शिरीष शेवाळकर, तृप्ती देशपांडे (मुखपृष्ठ) आणि राजहंस प्रकाशनातील सर्वांनी ह्या पुस्तकासाठी मेहनत घेतली. खूप खूप धन्यवाद.

**पुस्तकाविषयी माहिती :**
**पुस्तक : जीवदान (कादंबरी)**
**लेखक : सुधीर राजाराम देवरे**
**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ : 125, किंमत : 200 रुपये**
(अप्रकाशित लेख. इतरत्र वापर करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)
**डॉ. सुधीर राजाराम देवरेब्लॉगचा पत्ता :**
**http://sudhirdeore२९.blogspot.com/**

# सर्वांमध्ये श्रमसंस्काराची प्रतिष्ठा निर्माण झाली पाहिजे - डॉ. सोमीनाथ खाडे



**फुलंब्री :** दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे 'शाश्वत विकासासाठी युवकांचे योगदान' ही संकल्पना घेऊन राष्ट्रीय सेवा योजना शिबीर दिनांक ०१ ते ०७ जानेवारी २०२६ दरम्यान मौजे मूर्शीदाबादवाडी ता. फुलंब्री जि. छ. संभाजीनगर येथे सुरु आहे. शिबिराचे उदघाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक, डॉ. सोमीनाथ खाडे यांच्या हस्ते करण्यात आले.या शिबिराचे अध्यक्ष म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री देवजीभाई पटेल उपस्थित राहीले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे पालक संचालक, मा. श्री प्रदीप जब्दे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित राहीले. उपसरपंच जगन्नाथ पवार उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी केले.बोलत असतांना डॉ. प्रदीप जब्दे म्हणाले की, कोणतेही एखादे काम सुरु करायचे झाले तर प्रत्येकाच्या मनात चांगला भाव असतो. प्रत्येकाने आपल्या कामामध्ये शिस्त पाळली पाहिजे. स्वयंशिस्त असली पाहिजे. असे मत व्यक्त केले.उदघाटनपर बोलत असताना डॉ. सोमनाथ खाडे म्हणाले की, जन, जमीन, जल, जनावरे यांच्याबद्दलचा संस्कार सांगत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा उद्देश उपस्थितांना सांगितला. देशाला पुढे घेऊन जायचे असेल तर आपण देशाचे काही तरी देणे लागतो. आणि त्यासाठी ग्रामीण समस्या शोधून त्या समस्या प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. जे श्रम करतात त्यांची प्रतिष्ठा वाढविणे म्हणजे श्रमसंस्कार होय. जे जे माझं आहे ते सर्वांचं आहे. सगळी माणसं माझी आहेत. हा भाव या योजनेतून मिळत असतो. अध्यक्षीय समारोप संस्थेचे उपाध्यक्ष, मा. श्री देवजीभाई पटेल यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पायल तावरे हिने तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मानले. गावचे श्री दीपक पवार, यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी, डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती, काळे मॅडम, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व गावकरी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६


## आयुष्याच्या वाटेवर

धावता झालो मी
सकाळच्या उगवत्या
सूर्याच्या सोनेरी किरणासोबत

पण भेटली नाही वाट
आकाशाची..सूर्यकिरणसारखी

इथल्या वाटेवर
दगड धोंडे काटे कुटे
आधीच आले होते जन्माला

यांनी केले काम इमानदारीने
स्पीड ब्रेकरच अनेकदा

म्हणून थांबावा लागलं
वाटेवर
अन् वाटा साऱ्या बंद होता
शोधावी लागली नवी वाट
अन् कधी करावी लागली
तयार नवी वाट
खाचखळग्यांना घेऊन सोबत

आज
मागे वळून पाहताना
या खाचखळग्याचं मोल करतो आहे

त्यांच्या मुळेच उभा आहे
मातीवर पाय ठेवून घट्ट
आकाशाला गवसणी घालण्यासाठी



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## नववर्ष

सोनेरी प्रकाशात
उजळले नववर्ष
स्वागतासाठी सर्वांच्या
तनमनात हर्ष

भविष्याची स्वप्ने
मनात द्यावीत फुलू
प्रयत्नाच्या हिंदोळ्यावर
आनंदाने झुलू

नको कशाचे दुःख
नको विकार
मनातले संकल्प
करूया आता साकार

सर्वत्र नवी चाहूल
मनी नवी आशा
आनंदाने फुलेल
प्रत्येक दिशा

लावूनी पंख परिश्रमाचे
गाठूया पायरी यशाची
आनंदमयी व्हावे जीवन
हीच सदिच्छा नववर्षाची



**- रवींद्र व्ही.चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## प्रा. स्वाती तात्याराव कांबळे (वाव्हळे) यांना शिक्षणशास्त्रात पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** स्वाती तात्याराव कांबळे -वाव्हळे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. स्वाती कांबळे यांनी श्रमजीवी अध्यापक महाविद्यालय, उमरगा येथील प्राचार्य डॉ. विजय सरपे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत विद्यापीठाशी संलग्नित बी.एड. महाविद्यालयातील बी. एड. प्रशिक्षणार्थींच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास ' या विषयावर आपले संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.प्रशांत पगारे, मिलिंद कला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान, महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुशील बोर्डे, डॉ. जितेंद्र मगर, प्राचार्य डॉ.शिवाजी सूर्यवंशी, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. मधुकर वाकळे, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. प्रमिता कांबळे, डॉ. मिलिंद वाव्हळे, डॉ. विलास लिहिणार, डॉ. नंदकिशोर खिल्लारे, प्रा.राजू सुरवसे, प्रा. संतोष प्रधान आदींनी अभिनंदन केले आहे.

## प्रा. डॉ. मोहन सौंदर्य लिखित 'दलित आत्मकथने : मूल्य विचार' या पुस्तकाचे प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :** वरील विषयास अनुसरून आपणास आपणा विनंती करण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने दिनांक ०४/०१/२०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता प्रा.डॉ. मोहन सौंदर्य लिखित 'दलित आत्मकथने : मूल्य विचार' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय नागसेनवन, छत्रपती संभाजीनगर येथे ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते स. सो. खंडाळकर यांच्या हस्ते होणार असून या ग्रंथावर आंबेडकरी विचारवंत प्रो. डॉ. ऋषीकेश कांबळे, प्रो. डॉ. नवनाथ गोरे हे भाष्य करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे हे आहेत. या या कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. प्रमोद हिरोडे (प्राचार्य), डॉ. डॉ. युवराज धबडगे (प्रकाशक तथा सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद) हे राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. बाळासाहेब लिहिणार (उपाध्यक्ष), प्रा. डॉ. मिलिंद वाव्हळे (कोषाध्यक्ष), डॉ. शिवाजी डोळसे, डॉ. सुधाकर नवसागर, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. दैवत सावंत, डॉ. यजुवेंद्र वनकर, डॉ. ह. नि. सोनकांबळे, प्रा. दिनेश मगरे यांनी केले आहे.






## देवगिरी किल्ला खूपच सुंदर व अभेद्य किल्ला



**दौलताबाद (जावेद अहमद) :** कोटीश्वर सिंह न्यायमुर्ति यांनी सांगितलेसर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कोटीश्वर सिह यांची दौलताबाद किल्ल्यावर दि ३० मंगळवारी सपत्नीक भेट दिली महाकोट, अंबरकोट, सरस्वती विहीर, हत्ती हौद,भारतमाता मंदिर, काळकोट, चिनी महल, रंग महल, खंदक, अंधारी भूल भुलेया या ठिकाणी जाऊन भेट दिलीते किल्ला पाहून भारावून गेले होते किल्ला खूपच छान व सुंदर आहे व हा अजिक्य असल्याचे खूप गौरवशाली आहे असल्याचे दौलताबाद किल्ल्याच्या नोंद पुस्तकात नोंद केली आहे त्यांना शेख जावेद व शिवाजी गायकवाड सहायक पर्यटक यांनी माहिती दिलीकोटीश्वर यांना इतिहासाची आवड असल्याने खूपच बारकाईने निरीक्षण करून इतिहास जाणून घेत आपल्या मोबाईल मध्ये ऐतिहासिक वास्तू क्षण भेटीच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करून घेतली आहेजाभाळा येथील शेतकरी अशोक जाधव यांनी आपल्या शेतात पिकविलेल्या अंजीर व पेरू ची फळे भेट म्हणून त्यांना दिली श्रीमती कोटीश्वर यांनी सांगितले अंजीर फळे खूपच गोड व स्वादिष्ट असल्याचे सांगितले यावेळी नीरज विरवाडकर सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस उपनिरीक्षक आयुब पठाण, योगेश जाधव, बाबासाहेब आढाव

## जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची भाजीपाला परसबाग - प्रत्यक्ष शिक्षणाचा आदर्श उपक्रम



**खातखेडा :** येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात भाजीपाला परसबाग फुलवून प्रत्यक्ष शिक्षणाचा आदर्श घालून दिला आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव वाढत असून आरोग्यदायी आहाराचे महत्त्वही अधोरेखित होत आहे. कन्नड तालुक्यातील खातखेडा येथील जिल्हा परिषदेच्यानवीन वसाहत शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात भाजीपाला परसबाग फुलवत एक आदर्श उपक्रम राबविला आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका अर्पणा धाटबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी करडई, मुळे, पालक, मेथी, कोथिंबीर, आंबट चुका आदी विविध भाज्यांची लागवड केली आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी रोपांची लागवड, त्यांची निगा, पाणी व्यवस्थापन तसेच भाजी काढणीपर्यंतची सर्व कामे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः उत्साहाने पार पाडली.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६

# अंतर्मुख व्यक्तिमत्त्व आणि समाजाची समृद्धी

**स**माजामध्ये अनेकदा आवाज करणाऱ्यांनाच ऐकले जाते, बोलणाऱ्यांनाच नेतृत्व मिळते आणि स्वतःला सतत मांडणाऱ्यांनाच यशस्वी समजले जाते. अशा गोंगाटी सामाजिक वास्तवात शांत राहणारी, कमी बोलणारी, स्वतःच्या विचारविश्वात रमणारी अंतर्मुख व्यक्ती बहुतांश वेळा दुर्लक्षित राहते. म्हणूनच दरवर्षी 02 जानेवारी हा दिवस 'जागतिक अंतर्मुखी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका व्यक्तिमत्त्व प्रकाराचा उत्सव नसून, समाजाने दीर्घकाळ दुर्लक्ष केलेल्या एका महत्त्वपूर्ण मानवी प्रवृत्तीची दखल घेण्याचा, तिचा सन्मान करण्याचा आणि तिच्या सामाजिक योगदानाचे मूल्यमापन करण्याचा दिवस आहे.समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, अंतर्मुखता ही केवळ वैयक्तिक स्वभावाची बाब नसून ती सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, शिक्षणव्यवस्था आणि सत्तासंबंध यांच्याशी खोलवर निगडित आहे. कोणताही समाज विशिष्ट प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक महत्त्व देतो आणि त्यानुसार सामाजिक निकष निर्माण करतो. आधुनिक औद्योगिक व उत्तर-औद्योगिक समाजात बहिर्मुख व्यक्तिमत्त्वाला यश, नेतृत्व आणि आत्मविश्वासाचे प्रतीक मानले जाते. परिणामी अंतर्मुख व्यक्तिमत्त्वाला दुय्यम स्थान दिले जाते. ही असमतोल दृष्टी समाजाच्या समृद्धीसाठी घातक ठरू शकते.अंतर्मुख व्यक्ती या स्वभावतः विचारशील, निरीक्षणशील, संवेदनशील आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या असतात. त्या बोलण्याऐवजी ऐकणे पसंत करतात, गोंगाटापेक्षा शांतता निवडतात आणि बाह्य जगापेक्षा अंतर्गत जगाशी अधिक संवाद साधतात. समाज मात्र या गुणांना कमजोरी समजतो. 'कमी बोलणे म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव', 'एकटेपणा म्हणजे असामाजिकता' आणि 'शांतपणा म्हणजे अकार्यक्षमता' अशा गैरसमजांमुळे अंतर्मुख व्यक्तींना सतत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे लागते. समाजशास्त्र सांगते की हे गैरसमज सामाजिक पूर्वग्रहांचे परिणाम आहेत, वास्तवाचे नाहीत.भारतीय सामाजिक-सांस्कृतिक परंपरेत अंतर्मुखतेला पूर्वी मोठे महत्त्व होते. ध्यान, योग, तपश्चर्या, मौन आणि चिंतन या संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानाचा आत्मा होत्या. संत, महात्मे, विचारवंत आणि तत्त्वज्ञ हे बहुतेक वेळा अंतर्मुख प्रवृत्तीचे होते. त्यांनी समाजाला दिशा दिली ती गोंगाटातून नव्हे, तर शांत चिंतनातून. मात्र आधुनिक काळात पाश्चात्त्य प्रभावाखालील शिक्षणपद्धती आणि स्पर्धात्मक जीवनशैलीमुळे बहिर्मुखतेचे उदात्तीकरण झाले आणि अंतर्मुखतेचे अवमूल्यन सुरू झाले.शिक्षणव्यवस्थेत हा भेद प्रकर्षाने दिसून येतो. वर्गात सतत बोलणारे, प्रश्न विचारणारे, चर्चेत आघाडी घेणारे विद्यार्थी 'हुशार' मानले जातात, तर शांतपणे ऐकणारे, मनन करणारे विद्यार्थी दुर्लक्षित राहतात. अनेक अंतर्मुख विद्यार्थी अभ्यासात उत्कृष्ट असतानाही केवळ त्यांच्या स्वभावामुळे शिक्षकांच्या अपेक्षांमध्ये बसत नाहीत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही प्रक्रिया 'संस्थात्मक पक्षपात' दर्शवते, जिथे एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व प्रकार सर्वसाधारण मानक ठरतो आणि इतरांना दुय्यम मानले जाते.कार्यस्थळावरही अंतर्मुख व्यक्तींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मीटिंगमध्ये सातत्याने बोलणे, स्वतःच्या कामाची जाहिरात करणे, मोठ्या सामाजिक जाळ्यात सक्रिय राहणे यांना यशाचे मापदंड मानले जातात. अशा वातावरणात अंतर्मुख कर्मचारी मागे पडतात. मात्र संशोधनातून असे स्पष्ट होते की अंतर्मुख व्यक्ती निर्णयक्षम, सखोल विचार करणाऱ्या, दीर्घकालीन नियोजनात कुशल आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या असतात. समाज त्यांच्या या गुणांकडे दुर्लक्ष करतो, ही सामाजिक विसंगती आहे.लिंगभावाच्या संदर्भात अंतर्मुखतेचा अनुभव अधिक गुंतागुंतीचा ठरतो. पुरुषप्रधान समाजात बोलकेपणा, आत्मविश्वास आणि आक्रमकता हे पुरुषी गुण मानले जातात. शांत, अल्पसंवादी स्त्रियांना अनेकदा दुर्बल, दबलेली किंवा अक्षम ठरवले जाते. प्रत्यक्षात अनेक अंतर्मुख स्त्रिया कुटुंब, शिक्षण, संशोधन, सामाजिक सेवा आणि सर्जनशील क्षेत्रांत मोलाचे योगदान देत असतात. मात्र त्यांचा आवाज कमी असल्यामुळे त्यांचे कार्य पुरेसे प्रकाशात येत नाही. समाजशास्त्र ही स्थिती 'अदृश्य श्रम' म्हणून ओळखते.आजच्या डिजिटल युगात अंतर्मुख व्यक्तींना नवे व्यासपीठ मिळाले आहे. लेखन, संशोधन, कला, ऑनलाईन शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्या स्वतःला व्यक्त करू शकतात. सोशल मीडियावरील गोंगाटापेक्षा सखोल आशय निर्माण करणाऱ्या अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या वैचारिक संपत्तीत भर घालत आहेत. तरीही 'लाइक', 'शेअर' आणि 'व्हायरल' संस्कृतीमुळे बहिर्मुखतेलाच अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे अंतर्मुखतेला खरी मान्यता मिळण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो.जागतिक अंतर्मुखी दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे समाजाने स्वतःच्या मूल्यप्रणालीचा पुनर्विचार करावा. व्यक्तिमत्त्वाचा एकच साचा योग्य नसतो. समाजाची खरी ताकद विविधतेत असते. बहिर्मुख व्यक्ती समाजाला गती देतात, तर अंतर्मुख व्यक्ती समाजाला दिशा देतात. एकाशिवाय दुसरे अपूर्ण आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समावेशक समाज म्हणजे सर्व प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांना समान संधी आणि सन्मान देणारा समाज.अंतर्मुख व्यक्तींना बदलण्याचा आग्रह धरण्याऐवजी समाजाने त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. 'जास्त बोला' या सल्ल्याऐवजी 'तुमचे विचार महत्त्वाचे आहेत' ही भावना निर्माण झाली पाहिजे. शैक्षणिक संस्था, कार्यस्थळे आणि सामाजिक मंचांनी शांत विचारांना, सखोल अभ्यासाला आणि अंतर्मुख सर्जनशीलतेला वाव दिला पाहिजे. यामुळे समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि विवेकी बनेल. जागतिक अंतर्मुखी दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून तो समाजाच्या आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण शांततेला कसे पाहतो, कमी बोलणाऱ्यांना कसे वागवतो आणि वेगळेपणाला कितपत स्वीकारतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. गोंगाटातच शक्ती असते असा गैरसमज दूर करून शांततेतील सामर्थ्य ओळखणे ही काळाची गरज आहे.अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या कडेला उभ्या नसून त्या समाजाच्या मुळाशी आहेत. त्यांच्या शांत विचारांतूनच नव्या कल्पना जन्माला येतात, त्यांच्या संयमातूनच स्थैर्य निर्माण होते आणि त्यांच्या सखोल दृष्टिकोनातूनच समाजाला दीर्घकालीन दिशा मिळते. म्हणूनच जागतिक अंतर्मुखी दिन हा अंतर्मुखतेचा गौरव करण्याचा, तिच्या सामाजिक मूल्याची जाणीव करून देण्याचा आणि मानवी विविधतेचा सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण दिवस ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra५@gmail.com



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २ जानेवारी २०२६

# आयुष्याच्या प्रत्येक संकटात टिकून ठेवलेला संयम -तारांबळ

**ता**रांबळ* हे अंबादास केदार यांचं आत्मकथन गणगोत प्रकाशनाकडून १५ ऑगस्ट २०२१ रोजी प्रकाशित झालेलं आहे. या पुस्तकासाठी संतोष घोंगडे यांनी सुंदर असं मुखपृष्ठ केलेलं आहे. या पुस्तकाचे प्रकाशक गणगोत प्रकाशन देगलूर, जिल्हा नांदेड हे आहेत.या पुस्तकाचं स्वागतमूल्य ४५० इतकं असून हे पुस्तक लेखकाने आपल्या हाडाची काड करून शिक्षण देणाऱ्या आपल्या मायबापास अर्पण केलेलं आहे. या पुस्तकासाठी ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे यांची पाठराखण लाभलेले आहे. तारांबळ हा महाराष्ट्रातील ग्रामीण बोलीभाषेतला *शब्द' नुसता वाचला तरी अंगावर काटा येतो. ग्रामीण समाजिवनातील जिव्हाळ्याचा नसला तरी जिव्हारी लागणारा हा शब्द आहे. स्वतंत्र भारतातील प्रत्येक सर्वसामान्य कुटुंबातील माणसांनी हीच 'तारांबळ' अनुभवलेला तो कालखंड. देशाच्या स्वातंत्र्याच्या पंचविशीत भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षणाची आस धरू लागलेला समाज आणि घरातील अठराविश्व दारिद्र्य जे आजही समूळ नष्ट झालेलं नाही. पिढ्यानपिढ्याचं कौटुंबिक अज्ञान, अर्थिक, सामाजिक दृष्ट्या असलेलं मागासलेपण आणि बालवयातही सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या मुलाने कौटुंबिक जबाबदारी पेलण्याचे ते दिवस. शिकण्याची जिद्द, चिकाटी, कौटुंबिक आर्थिक दौर्बल्याने खचून न जाता संघर्ष करण्याची तयारी. आयुष्याच्या प्रत्येक संकटात टिकवून ठेवलेला संयम. याचं वेळोवेळी दर्शन या आत्मकथनामध्ये आपल्याला दिसून येतं. लेखकाची लिहिण्याची शैली ग्रामीण मराठवाडी बोलीतील असून, लिखाणातील निरागसता ही लेखकाच्या लिखाणाच्या प्रेमात पडायला भाग पाडणारी गोष्ट आहे. या कथानकात कसल्याही प्रकारची ओढताना अथवा शब्दांची जुळवा जुळवा आपल्याला दिसत नाही.तर जे लेखकाने प्रत्यक्ष जगलेलं, भोगलेलं, अनुभवलेलं कौटुंबिक समाजजीवन व त्याचं भयावह चित्र आपल्या डोळ्यासमोर उभा केलेलं आहे. ज्या समाजामध्ये शिक्षण हे त्यांच्या गावालाही नव्हतं. फक्त पोटासाठी जगत राहणं. भूक आणि भाकरीचा संघर्ष करत राहणं. अन्न वस्त्र निवारा याच गरजेच्या गोष्टी समजून याच्यासाठी आयुष्य काढत राहणं अशा परिस्थितीत एका सर्वसामान्य कुटुंबात अंबादास केदार यांचा जन्म होतो. एकूण पाच मुलं आणि आई वडील असे हे कुटुंब. लेकरांच्या भुकेसाठी रात्रंदिवस वन-वन करणारे आई-वडील, त्याच्यातच जगाच्या बरोबरीने राहत असताना शिकावं लागणं किंवा आपल्या वाट्याला आलेलं अज्ञान दूर करण्यासाठी उपाय शोधणं, त्यासाठी आपण जे कष्ट भोगतो आहे आपण जे कष्टप्रद जीवन जगत आहे त्याच्यातून आपल्या पुढच्या पिढीला मुक्तता मिळाली पाहिजे याच्यासाठी धडपडणारे त्यांचे आई-वडील.त्याच तळमळीने शिक्षण घेणारे आणि आई-वडिलांचा आदर करणारे अंबादास. सुसंस्कारी कुटुंब सुसंस्कारी मुलं त्यांच्या वाट्याला आलेलं दारिद्र्य. त्या दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी ची धडपड, चिकाटी, शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे कष्ट करण्याची तयारी या कथेतील प्रत्येक शब्द शब्दातून आपणाला जाणवते.तारांबळ कुणाच्या वाट्याला नसते. तारांबळ ग्रामीण जीवनातील प्रत्येक कुटुंबाच्या पाचवीलाच पुजलेली असते. परंतु ही माणसं तारांबळीन खचून जात नाहीत. रोजच्या येणाऱ्या दिवसाला पाठ देत राहतात. एकमेकांना आधार देत राहतात. एकमेकांना बळ देत राहतात. एकमेकांच्या खंबीरपणे पाठीशी उभी राहतात. कधी कधी त्रासदायक ठरणारी माणसं सुद्धा ग्रामीण भागात एकमेकांच्या उपयोगी पडतात. याचं सुंदर दर्शन शब्दा शब्दातून अंबादास केदार आपल्याला घडवून आणतात. अंबादास केदार यांना शिक्षणाची आवड तर आहे, शिकायचं तर आहे परंतु ते म्हणावे तितके हुशार नाहीत, बुद्धिमान नाही असा त्यांचा समज आहे. प्राथमिक शाळेत शिकत असताना त्यांना आलेले अनुभव आणि त्यांची कौटुंबिक परिस्थिती त्यामुळे शिकताना होणारी तारेवरची कसरत त्यांनी वेळोवेळी या कथानकात सांगितलेली आहे. जेव्हा ते दहावीच्या वर्गामध्ये जातात तेव्हा त्यांना खूप आनंद होतो. ते जिद्दीने चिकाटीने अभ्यास करतात त्या परिस्थितीत शिक्षणासाठी ओढाताण होत असताना त्यांना अनेक वेळा मजुरी करावी लागते. पाच दहा रुपयांसाठी किंवा शाळेतील फी साठी अनेक वेळा अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागते. दहावीच्या वर्षातील एक दोन प्रसंगाची त्यांनी वर्णन केल्यानंतर आपले डोळे अचानक गळायला लागतात. दहावीच्या परीक्षेत फी भरायला लेखक कडे पैसे नसतात, लेखक पैशाची मागणी मामाकडे करतात, तेव्हा मामाकडून नकार मिळतो. १२० रुपयासाठी लेखक मामाच्या गावावरून आपल्या गावाकडे चालत जातो. तिथेही पैसे मिळत नाही. तेव्हा लेखक वडील ज्या गावात काम करत आहेत त्या गावात चालत जातात. लेखकाला पाहून लेखकाची वडील विचारतात.."तू का आलास? " तेव्हा लेखक सांगतात, "मला शाळेची फी भरायची आहे. " फी ची रक्कम कळल्यानंतर वडील नवल करतात १२० रुपयासाठी दोन वेळा माझ्या मुलाला इतक्या दूरवरून माझ्याकडे चालत यावे लागले. त्याप्रसंगी आर्थिक परिस्थितीने विकल असलेल्या समाजातील भयावहता मनात काहूर निर्माण करते. इयत्ता दहावी मध्ये लेखक चार ते पाच वेळा नापास होतात. १० वी काढण्यासाठी लेखकाची तब्बल तीन वर्षे वाया जातात. त्या तीन वर्षाचे रिझल्ट घेऊन अकरावीच्या ऍडमिशन साठी फिरताना लेखकांनी त्यांची उडालेली तारांबळ येथे नोंद केलेली आहे. त्याचप्रमाणे अकरावीत ऍडमिशन घेण्यासाठी लागणारे पैसे ,कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी लागणारे पैसे, वह्या पुस्तकासाठी लागणारे पैसे या कारणांनी लेखकाला दहावीच्या वयापासूनच सिमेंटच्या गाडीवर मुंबईला जाऊन हमाली करण्याची वेळ येते. इतक्या लहान वयात उन्हाळ्यात सुट्टी दिवाळी सुट्टी लेखक खेळण्याकुदण्याच्या वयात देखील सतत काम करत असतात. शाळेच्या दिवसातही बऱ्याच वेळा लेखकाला दिवसपाळी, रात्रपाळी या परिस्थितीत काम करावे लागते. योगायोगाने अकरावीनंतर चांगले कॉलेज त्यांना भेटते .कमवा आणि शिका योजनेमध्ये त्यांना शिक्षण घ्यायला संधी भेटते. चांगले शिक्षक भेटल्यामुळे वस्तीगृहात राहण्याची संधी मिळते. परंतु पाचवीला पुजलेलं दारिद्र्य मात्र हटता हटत नाही. येणारी संकट मात्र थांबायचं नाव घेत नाहीत. या सर्व परिस्थितीचे वर्णन वाचत असताना ग्रामीण परिस्थिती भोगलेल्या माणसाच्या मनात कालवा कालव झाल्याशिवाय राहत नाही. डोळे भरून आल्याशिवाय राहत नाहीत. प्रत्येक पान वाचत असताना डोळ्यातून केव्हा अश्रू गळायला लागतात हे कळतही नाही. हे चित्र पाहत असताना आज देखील समाजातील शैक्षणिक किंवा सामाजिक परिस्थिती फारसा काही बदल झाला असेल असं वाटत नाही. शैक्षणिक ध्येय धोरण बदलत असताना, आधुनिकतेच्या वाटेने प्रवास करत असताना, आपण चंद्राच्या आणि मंगळाच्या गप्पा मारत असताना, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्याला जागतिक पातळीवर तयार करण्याची स्वप्न पाहत असताना, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या घरावर छप्पर आहे की नाही त्याच्या अंगात गणवेश आहे की नाही किंवा दोन वेळचं त्याला जेवायला भेटते की नाही या गोष्टीचा विचार देखील शासनाकडून व्हायला हवा. अशा प्रकारची समस्या किंवा प्रश्न अंबादास केदार यांचा आत्मकथन वाचत असताना आपल्याला वेळोवेळी जाणवतात. आज जरी मध्यान भोजनाने किंवा मोफत पाठ्यपुस्तक वाटप केल्यामुळे पाठ्यपुस्तकाचा आणि मध्यान भोजनाचा प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरील प्रश्न सुटलेला असला तरी विद्यार्थ्यांकडून वाढत्या शैक्षणिक अपेक्षा त्यानुसार त्यांच्याकडे असणारा अपुरा साधनपुरवठा, त्यामुळे मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की आजच्या समजव्यवस्थेत देखील अंबादास केदार यांच्यासारखे किंवा आपल्यासारखे असे किती विद्यार्थी शिक्षणापासून वंचित असतील. किती आई-वडिलांच्या वाट्याला अजूनही हे दारिद्र्य आलेलं असेल. अंबादास केदार यांच्यासारखे सगळेच विद्यार्थी सहनशील जिद्दी, चिकाटीचे आणि अभ्यासू असतील का ?त्यांना आजची ही परिस्थिती बदलायची असेल का ?अंबादास केदार यांचे आत्मकथन वाचत असताना शिक्षणासाठी कधी त्यांच्या वडिलांना दुभती म्हैस विकावी लागते. कधी शेतातील आंब्याचं झाड विकावं लागतं,कधी घरावरचे पत्रे विकावे लागतात. एक वेळ अशी येते की अंबादास केदार यांच्या वडिलांना स्वतःच शेत आणि घर देखील विकावं लागतं .परंतु या परिस्थितीने घाबरून न जाता अंबादास केदार आणि त्यांचे आईवडील व सर्व कुटुंब येणाऱ्या प्रत्येक वादळामध्ये खंबीरपणे उभे राहतात. जगण्यासाठी आणि शिक्षणासाठी धडपडणारं हे कुटुंब किती धाडसी आहे, किती धडपडणारं आहे, किती कष्टाळू आणि आपल्या जीवनाशी किती प्रामाणिक आहे हे आपणाला या कथानकातून वेळोवेळी जाणवतं. अंबादास केदार बी.ए पूर्ण करतात. एमए पूर्ण करतात. बीएड पूर्ण करतात. हे करत असताना त्यांना वेळोवेळी तारेवरची कसरत करावीच लागत असते. बीएड झाल्यानंतर नोकरीच्या पूर्वी त्यांना लग्न देखील करावा लागतं. अशा परिस्थितीत अगोदरच खाण्यापिण्याची वांदे असताना त्यात आणखी एका माणसाची भर पडते. आणि त्यावेळी जी कुटुंबाची छिन्नविछिन्न अवस्था होते ती वाचताना काळीज कातरून जातं. अंगावरती शहारे येतात. शिक्षक झाल्यानंतर देखील जेव्हा अंबादास केदार यांना मजुरीवर जावं लागतं त्यावेळेस काळजाच्या चिंधड्या चिंधड्या होतात. पण माणसाच्या आयुष्यात सुख आणि दुःख हे कायम आहे. आता कुठे अंबादास केदार यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस यायला लागतात. याच परिस्थितीत लेखकांची वडील यांचे दुःखद निधन होतं. लेखकांचे कुटुंब या दुःखातून सावरते नसावरते तोवर पुन्हा लेखक आपल्या आईलाही गमावतात. आणि केदार कुटुंबीयांवरती दुःखाचा डोंगरच कोसळतो. लेखक या घटनेने घाबरून जातात. त्यांच्या मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण होते .परंतु संकट येतच राहणार माणसाने त्या संकटाना मान्य करून तोंड देत राहिलं पाहिजे. यासाठी लेखक सतत प्रयत्नशील आहेत. आणि त्यांच्या प्रयत्नाला सातत्याने यश येत राहो हिच सदिच्छा.

**शंकर अभिमान कसबे**
मु. पो. सुर्डी ता. बार्शी जि. सोलापूर
संपर्क. ८८०५५१२८१३

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com